पशुचिकित्सा

# जनावरांमधील लम्पी रोग; प्रादुर्भाव आणि उपाययोजना



**डॉ. कल्याणी सरप**
(मो.नं. ९०९६८७०५५०)
विषय विशेषज्ञ (पशुसंवर्धन),
**डॉ. व्ही.जी. अतकरे**
पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग,
कृषी महाविद्यालय, नागपूर



लम्पीचे शेळ्या- मेंढ्यांमधील देवीच्या विषाणूशी साधर्म्य आढळून येत असले तरी हा आजार शेळ्या- मेंढ्यांना होत नाही. हा आजार गायी- म्हशींमध्ये होतो. मुख्यत्वे देशीपेक्षा संकरित जनावरांमध्ये लागण होण्याची शक्यता अधिक आहे. हा आजार जनावरांपासून किंवा त्यांच्या दुधातून मानवात संक्रमित होत नाही. या रोगाचे विषाणू ७० डिग्री सेल्सियस तापमानाला १ ते ३ मिनिटांमध्ये निष्क्रिय होतात त्यामुळे उकळलेल्या दुधामध्ये हे विषाणू जिवंत राहत नाहीत. उष्ण व आर्द्र हवामानात या रोगाचा जास्त प्रसार होतो. या आजाराचा मृत्युदर १ ते २ टक्के आहे.

पशुपालक बांधवानो, मागील काही महिन्यांमध्ये आपल्या गायी-म्हशींना लम्पी या त्वचारोगाची मोठ्या प्रमाणावर लागण होत आहे. त्यामुळे आपले गोधन कसे सुरक्षित राहील याची काळजी व प्रतिबंधात्मक उपाय यांचे नियोजन आपण केले पाहिजे. गायींना लम्पी हा संसर्गजन्य व विषाणुजन्य त्वचेचा आजार सर्वप्रथम दक्षिण आफ्रिकेत झाला होता. तेथे हा रोग इ. स. १९२९ पासून १९७८ पर्यंत आढळत होता. नंतर या रोगाने आसपासच्या देशांमध्ये शिरकाव केला; मात्र २०१३ नंतर या रोगाचा वेगाने आणि झपाट्याने सर्वदूर प्रसार होऊ लागला आहे. हा रोग अनेक युरोपीय व आशियाई देशांमध्ये पसरत आहे. भारतात या रोगाची नोंद सर्वप्रथम



ओरिसा राज्यात झाली. नंतर राजस्थान, पंजाब व गुजरात या राज्यांपाठोपाठ महाराष्ट्रात दाखल झालेल्या लम्पी या त्वचारोगाने पशुधनावर मोठे विघ्न आणले आहे. राज्यामध्ये अहमदनगर, धुळे, पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली, अकोला, जळगाव, लातूर, उस्मानाबाद, बीड, औरंगाबाद, अमरावती, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ, परभणी, नाशिक अशा जिल्ह्यांमध्ये या रोगाचा झपाट्याने प्रादुर्भाव झाला आहे.

यावर उपाय योजना म्हणून राज्य शासनाने ८ सप्टेंबर २०२२ रोजी पूर्ण राज्य नियंत्रित क्षेत्र म्हणून घोषित केले. जनावरांचे सर्व बाजार, पशुप्रदर्शने, आंतरराज्य व राज्यांतर्गत गोवंशीय व महिषवर्गीय पशुवाहतूक व बैलगाडा शर्यतींवर बंदी घातलेली आहे. तसेच बाहेरून जनावरे खरेदी करण्यावरही बंदी घातलेली आहे. पशुसंवर्धन विभागामार्फत लम्पी प्रादुर्भाव झालेल्या गावापासून ५ कि.मी. परिघातील क्षेत्रामध्ये लसीकरण करण्यास प्राधान्य दिलेले आहे.

**या रोगाचा संसर्ग होण्याचे कारण** : विषाणुजन्य चर्मरोग- हे विषाणू देवी विषाणू गटातील कॅप्रिपोक्स प्रवर्गात मोडतात.

**प्राण्यांपासून संक्रमित होत नाही**

लम्पीचे शेळ्या- मेंढ्यांमधील देवीच्या विषाणूशी साधर्म्य आढळून येत असले तरी हा आजार शेळ्या-मेंढ्यांना होत नाही. हा आजार गायी- म्हशींमध्ये होतो. मुख्यत्वे देशीपेक्षा संकरित जनावरांमध्ये लागण होण्याची शक्यता अधिक आहे. हा आजार जनावरांपासून किंवा त्यांच्या दुधातून मानवात संक्रमित होत नाही. या रोगाचे विषाणू ७० डिग्री सेल्सियस तापमानाला १ ते ३ मिनिटांमध्ये निष्क्रिय होतात त्यामुळे उकळलेल्या दुधामध्ये हे विषाणू जिवंत राहत नाहीत. उष्ण व आर्द्र हवामानात या रोगाचा जास्त प्रसार होतो. या आजाराचा मृत्युदर १ ते २ टक्के आहे.

**रोगप्रसार :** डास, चावणाऱ्या माश्या, गोचिड, चिलटे, बाधित जनावरांचा स्पर्श तसेच दूषित चारा- पाणी या माध्यमांतून लम्पी आजाराचा रोगप्रसार होतो.

**लक्षणे** : १) सुरवातीला जनावरांना भरपूर ताप येतो. २) अंगावर विशेषत: डोके, मान, पाय, कास इत्यादी ठिकाणी १० ते ५० मि.मी. व्यासाच्या गाठी येतात. ३) या गाठी पिकून त्यातून पू वाहू लागतो. तसेच त्वचेवरील वाळलेल्या खपल्यांमधे हा विषाणू ३० ते ३५ दिवस जिवंत राहतो. ४) जनावरांच्या तोंडातून मोठ्या प्रमाणात लाळगळती होते. ५) फुफ्फुसदाह, कासदाहाची बाधा, गर्भपात होतो, प्रजनन क्षमता घटते, रक्तातील पांढऱ्या पेशी व प्लेटलेटस्‌ची संख्या कमी होते. ६) जनावरांचे चारा खाणे, पाणी पिणे कमी होते किंवा बंद होते. ७) काही जनावरांमध्ये पायावर सूज येऊन जनावर लंगडायला लागतात. ८) दूध उत्पादन कमी होते.

**उपचार** : रोग विषाणुजन्य असल्याने त्यावर प्रभावी उपचार नाहीत. प्रतिजैविके, ज्वरनाशक, प्रतिकारशक्तिवर्धक जीवनसत्त्वे अ व ई तसेच शक्तिवर्धक जीवनसत्त्वे यांचा वापर करावा.

त्वचेवरील व्रणसाठी antiseptic cream चा वापर करावा. तोंडामध्ये व्रण झाल्यास २% potassium permangnet च्या द्रावणाने धुवावे व बोरो ग्लिसरिन लावावे.

### घरगुती उपचार असे करावेत

* राष्ट्रीय डेअरी विकास बोर्डाने सुचविल्याप्रमाणे औषधे व मलम बनवून जखमांवर लावावे.

* औषधी बनविण्यासाठी १० विड्याची पाने, १० ग्रॅम मिरे, १० ग्रॅम मीठ यांची पेस्ट बनवून त्यामध्ये १०० ग्रॅम गूळ टाकावा. ही पेस्ट जनावरांना पहिल्या दिवशी दर ३ तासांनी द्यावी व नंतर दुसऱ्या दिवसापासून दिवसाकाठी ३ वेळा- अशी १५ दिवस द्यावी.

### मलम बनविण्यासाठी सामग्री

* ३० ते ४० कुप्पीची पाने, १० लसणाच्या पाकळ्या, ३० ते ४० कडुनिंबाची पाने, ३० ते ४० मेहंदीची पाने, ५०० मि.लि. खोबरेल किंवा तिळाचे तेल, ३० ते ४० तुळशीची पाने आणि २० ग्रॅम हळद एवढी सामग्री लागेल. सर्वप्रथम ही सर्व पाने एकत्र करून त्यामध्ये हळद टाकावी. नंतर खोबरेल किंवा तिळाचे तेल टाकून हे मिश्रण उकळून घ्यावे व थंड करून जनावरांच्या जखमेवर लावावे.

* जखमेमध्ये कीड पडली असेल तर खोबरेल तेलामध्ये कापूर टाकून ते मिश्रण जखमेमध्ये टाकावे तसेच सीताफळाच्या झाडाची पाने बारीक करून ती कीड असलेल्या जागेवर लावावी.

### पशुपालकांनी घ्यावयाची काळजी

गोठा व आसपासचा परिसर स्वछ ठेवावा.

शेण, लघवी व सांडपाणी यांचा योग्य निचरा करावा, जेणेकरून गोठ्याची जागा स्वच्छ व कोरडी राहील. त्यामुळे माश्या, डास, गोचिड व चिलटे या रोग पसरविणाऱ्या बाह्य कीटकांचे प्रमाण कमी होईल.

गोठ्यामध्ये sodium hypochloride/ phenyl यांची फवारणी करावी.

गोठ्यातील गाय बाधित असल्यास तिची व्यवस्था निरोगी जनावरांपासून वेगळी करावी.

रोग प्रादुर्भाव झालेल्या गावातील बाधित व निरोगी जनावरांना चराऊ कुरणांमध्ये एकत्रित सोडण्यास मनाई करावी.

जनावरांची हाताळणी केल्यानंतर हात साबणाच्या पाण्याने धुवावेत किंवा sanitizer ने साफ करावेत.

बाधित जनावरांच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींनी व पशुवैद्यक यांनी आपले कपडे व साहित्य यांचे योग्य द्रावणाने निर्जंतुकीकरण करावे.

जनावरांचा उपचार करताना नवीन सिरिंज नीडलचा वापर करावा.

निरोगी जनावरांच्या अंगावर किडे न चावण्यासाठी औषध लावावे व गोठ्यामध्ये यासाठी औषधांची फवारणी करावी.

त्वचेवरील गाठींचे जखमेत रुपांतर झाल्यास, जखमेत जंतू पडू नयेत यासाठी जखमेवर पशुवैद्यकाच्या सल्ल्यानुसार औषध लावावे.

गाय आणि म्हशींना वेगवेगळ्या ठिकाणी बांधावे.

रोज सायंकाळी किंवा रात्रीच्या वेळी गोठ्यामध्ये कडुनिंबाच्या पानांचा धूर करावा.



रोगग्रस्त जनावर दगावल्यास त्याचे शरीर ८ फूट खोल खड्डा करून त्यात पुरावे.

### पशुपालकांनी काय करू नये ?

आजारी जनावरांचा शिलक्क राहिलेला चारा, त्यांची पाण्याची भांडी निरोगी जनावरांसाठी वापरू नये.

आजारी जनावरांचे दूध (सुरुवातीच्या धारा) काढू नये.

आजारी जनावरांच्या गोठ्यामध्ये सर्वांना मुक्त प्रवेश देऊ नये.

**प्रतिबंध :** पशुवैद्यकाच्या मार्गदर्शनानुसार लसीकरण करून घ्यावे. प्राण्यांमधील संक्रमक व सांसर्गिक रोगास प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम २००९ मधील कलम ४ (१) अन्वये पशुमध्ये या रोगाची लक्षणे आढळून आल्यास प्रत्येक व्यक्ती, अशासकीय संस्था, संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था यांनी लेखी स्वरुपात नजीकच्या पशुवैद्यकीय संस्थेस कळविणे बंधनकारक आहे. ■